प्रेस नोट दि. १८/०८/२०१८

## अवैध धंद्यांवर छापा तसेच खाजगी शस्त्र परवाना धारकाचे अग्निशस्त्र ताब्यात घेतले बाबत

दि. १८/०८/२०१८ रोजी ००:०० वा. ते ०३:०० वा. दरम्यान पुणे शहरातील अवैधरित्या चालणा-या धंद्यांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

१. सोलापूर बाझार येथे पुलगेट बस स्टॉप शेजारी पत्र्यांच्या आड मोठ्या प्रमाणात जुगार चालु असल्याची बातमी मिळाल्यावरुन सदर अड्यावर छापा टाकून जुगार खेळणा-या २१ इसमांना व ०२ व्यवस्थापकांना ताब्यात घेवून त्यांच्यावर मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये कारवाई करण्यात आली. सदर कारवाई मध्ये एकूण २,६७,१००/- रु. रोख जप्त करण्यात आले आहेत.

२. हॉटेल इथोपीया एम क्युब, ढोले-पाटील रोड, कोरेगांवपार्क येथे अनाधिकृत चालणा-या हुक्का पार्लरवर छापा टाकून तंबाखूजन्य उत्पादने ( जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा आणि वितरण विनियमन ) अधिनियम २००३ कायद्यान्वये कारवाई करण्यात आली असून एकूण ६ खटले कोरेगांवपार्क पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आले आहेत.

३. सदर हॉटेल इथोनेशिया एम क्युब मधील कारवाई दरम्यान इसम नामे आर. पी. सिंग, रा. लखनऊ, उत्तर प्रदेश याच्या कब्जात उत्तर प्रदेश सरकार कडील परवाना असलेले एक रिव्हॉल्वर मिळून आले. सदर रिव्हॉल्वर व शस्त्र परवान्या बाबत अधिक माहिती घेतली असता,त्याने सदरचे शस्त्र स्व-संरक्षणासाठी घेतले असले बाबत आढळून आले. परंतु सदर इसम पुणे कॉन्टोमेंट बोर्डाचे नगरसेवक विवेक यादव यांचा अंगरक्षक म्हणून नोकरी करीत असल्याचे त्याचेकडे अधिक चौकशी करता समजले. त्यामुळे सदर इसमास व त्याचे ताब्यातील रिव्हॉल्व्हर व ११ जिवंत राऊंड व शस्त्र परवाना पुढील कारवाईकामी कोरेगांवपार्क पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

तरी या द्वारे आवाहन करण्यात येते की, कोणाही व्यक्तीकडे परराज्यातील परवाना असलेले अग्निशस्त्र असल्यास शस्त्र परवानाधारक व्यक्ती ज्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास आहे तेथील स्थानीक पोलीस स्टेशन येथे त्याची नोंद करणे आवश्यक आहे. तसेच ज्या कारणासाठी शस्त्र घेण्यात आले आहे त्याच कारणासाठी शस्त्र परवानाधारकाने त्याचा वापर करावा. जर अग्निशस्त्राचा अन्य कारणासाठी वापर

केल्याचे आढळून आल्यास सदर परवानाधारक व्यक्तीवर शस्त्र अधिनियमान्वये कारवाई करण्यात येईल.

सदर कारवाई गुन्हे शाखेचे श्री. प्रदिप देशपांडे सो, अपर पोलीस आयुक्त, श्रीमती ज्योतीप्रिया सिंग, पोलीस उप-आयुक्त, श्री. शिरीष सरदेशपांडे सो, पोलीस उप-आयुक्त व श्री. भानुप्रताप बर्गे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील ०४ अधिकारी व १६ कर्मचारी यांनी केली आहे.